जिल्हा व सत्र न्यायालय,
डी.एस.पी. चौक, अहमदनगर
दूरध्वनी कमांक ०२४१—२३४६०४७

## जाहीर निविदा

जिल्हा व सत्र न्यायालय, अहदनगर व जिल्हा न्यायालयाचे अंतर्गत असलेल्या तालुका न्यायालयातील न्यायीक अधिकारी व कर्मचा—यांचे मासिक वेतन व भत्त्यामधून आयकर रकमेची कपात केली जाते त्या रकमेवर दर तीन महिन्याला सनदी लेखापालांकडून (सी.ए.) टी.डी.एस. बाबत रिटर्न भरावे लागते व कार्यालयीन खर्चाची देयके तयार करतांना जो टी.डी.एस कपात केला जातो त्या रकमेवर दर तीन महिन्यायाला सनदी लेखापालांकडून (सी.ए.) टी.डी.एस. बाबत रिटर्न भरावे लागते तसेच कार्यालयीन खर्चाची जास्त रकमेची बिले असल्यास त्यावर जी.एस.टी. ची कपात केली जाते त्याचे रिटर्न दर महिन्याच्या १० तारखेच्या आत भरावे लागते. त्यामुळे जिल्हा व सत्र न्यायालय, अहदनगर व जिल्हा न्यायालयाचे अंतर्गत असलेल्या तालुका न्यायालयांची (अशा एकूण ३१ आहरण व संवितरण अधिकारी असून त्यांच्या न्यायालयांची) सनदी लेखापालांकडून (सी.ए.) टी.डी.एस. रिटर्न, जी.एस.टी. रिटर्न भरण्यकरिता स्थानिक बाजारपेठेतून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तरी इच्छुक असलेल्या सनदी लेखापालांकडून (सी.ए.) टी.डी.एस. दरपत्रके मागविण्यात येत असून त्यांनी दरपत्रकांच्या पाकीटाच्या वरच्या भागावर मोठया अक्षरात दरपत्रक कशासाठी आहे ते लिहून सदरचे दरपत्रक मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, साहेब अहमदनगर यांचे नावाने सोमवार, दिनांक १२/०८/२०२४ रोजी सायंकाळी ०६—०० पर्यंत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, डि.एस.पी. चौक, अहमदनगर यांचे कार्यालयात आणून देणे आवश्यक आहे. तद्नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

हुकूमावरुन,
Nburhade
31/07/24
सहाय्यक अधिक्षक,
लेखा व वित्त विभाग,
जिल्हा न्यायालय, अहमदनगर

जिल्हा न्यायालय, अहमदनगर
दिनांक :— ३१/०७/२०२४

**प्रत:—**

१. मा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर,
२. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर
३. मा. कोषागार अधिकारी, अहमदनगर
४. मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
५. जिल्हा न्यायालय, अहमदनगर ई—कोर्ट साईट
वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर डकवणेकरीता.